# प्रेसनोट

## मोक्का गुन्हातील आरोपी विशाल सज्जन फाळके यास गावठी पिस्टल व दोन जिवंत काडतुसा सह गुन्हे शाखा युनिट ३ ने केले जेरबंद

---

दि.०६/०८/२०१९ रोजी गुन्हे शाखा,युनिट- ३ मधिल पोलीस नाईक सचिन गायकवाड यांना त्यांचे बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की,पोलीस अभिलेखावरील गुन्हेगार विशाल सज्जन फाळके हा आम्रपाली हॉटेल समोर पुणे बेंगलोर हायवेजवळ सार्वजनिक रोडवर वारजे पुणे. येथे थांबलेला असुन त्याच्याकडे पिस्टल आहे. त्यानुसार पोलीस उपनिरीक्षक राजकुमार केंद्रे व त्यांचे अधिनस्त पोलीस कर्मचारी पोहवा क्षिरसागर,पोना सचिन गायकवाड,पोना विल्सन डिसोझा यांनी आम्रपाली हॉटेल समोर वारजे या ठिकाणी जावुन शिताफीने पोलीस अभिलेखावरील गुन्हेगार विशाल सज्जन फाळके यास १५/२५ वा. पकडले. त्याचे अंगझडती घेता एक गावठी पिस्टल व दोन जिवंत काडतुसे असा किंमत रु. ६०,८०० चा माल मिळुन आलेला आहे. त्याचे विरुध्द वारजे माळेवाडी पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक राजकुमार केंद्रे गुन्हेशाखा युनिट ३ पुणे शहर हे करत आहेत. त्याचे विरुध्द दाखल गुन्हाची माहीती पुढील प्रमाणे.

| अ.क्र. | पोलीस स्टेशन | गु.र.नं. व कलम |
|---|---|---|
| १ | भारती विध्यापीठ पो.स्टे पुणे. | १९७/२०१५ भा.दं.वि.कलम ३८७,३२३,३४ आर्म अॅक्ट ४(२५) सह मोका का. कलम ३ १(II)३(IV) |
| २ | तासगाव पोलीस स्टेशन जि. सांगली. | १८१/२०१५ भा.दं.वि.कलम ३२४,३२३,५०४,३४ |
| ३ | तासगाव पोलीस स्टेशन जि. सांगली. | २१०/२०१५ भा.दं.वि.कलम ३२६,३२३,५०४,३४ |
| ४ | तासगाव पोलीस स्टेशन जि. सांगली. | २२५/२०१९ भा.दं.वि.कलम ३०७,३२३ आर्म अॅक्ट ४(२५) |

सदरची कामगिरी अपर पोलीस आयुक्त गुन्हे श्री.अशोक मोराळे, पोलीस उप-आयुक्त गुन्हे पुणे श्री.बच्चन सिंह यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.राजेंन्द्र मोकाशी, पोलीस उप निरीक्षक राजकुमार केंद्रे, पोलीस उप निरीक्षक संजय गायकवाड, पोलीस उपनिरीक्षक किरण अडागळे, पो.हवा. संतोष क्षिरसागर ,पोना सचिन गायकवाड, विल्सन डिसोझा यांच्या पथकाने केली आहे.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक,
युनिट-३, गुन्हे शाखा,पुणे शहर.